# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.06.2025** **वार:बुधवार**

---

1. गेल्या 11 वर्षात संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर केंद्र सरकारनं लक्ष केंद्रित केल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
3. बँका, शेअर्समधील दावा न केलेली रक्कम गुंतवणूकदारांना परत करण्यासाठी वेगवान मोहीम राबवण्याचे केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आदेश आणि
4. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे हरित कर्जरोखे मुंबई शेअर बाजारात सूचीबद्ध

**<u>सुशासन</u>**

गेल्या 11वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात लक्षणीय बदल होत असून देश आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने गतीने वाटचाल करत आहे, अस प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशानं आधुनिकीकरण आणि संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. देशाचे नागरीक आपल्या देशाला अधिक मजबूत बनवण्याचा संकल्प घेऊन एकत्र आल्याचं पाहून आनंद होत असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, केंद्रातील मोदी सरकारला 11 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर काल देशातील भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारच्या कामाचा लेखाजोखा मांडला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितल. सरकारने एका वर्षात 30 लाख घरं देण्याचा विक्रम केला, 81 कोटी लोकांना मोफत अन्नधान्य, 15 कोटी घरांना नळजोडणी, 12 कोटी घरांमधे शौचालय दिलं असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. देशाची संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता या बाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले......

**पाच हजार अशी उपकरणं जी आपण आयात करत होतो. ती शंभर टक्के आता भारतामध्ये बनतात आणि आपण त्याचा निर्यात करतो. संरक्षण दलासाठी आपल्या स्टार्टअप आणि एमएस मधनं भारतातल्या केंद्र सरकारनं चोवीस हजार कोटी रुपयांची खरेदी केली आहे, म्हणजे आपली आत्मनिर्भरता त्यातनं दिसते आणि ज्या काही आपल्या ऑर्डनन्स फॅक्टरी आहेत. यातल्या सात ऑर्डनन्स फॅक्टरी या सार्वजनिक उपक्रमाच्या माध्यमातून नव पद्धतीची संरक्षण सामग्रीचं उत्पन्न करत आहेत, आणि त्यातल्या सहा नफ्यात आहेत आपण त्यातून एक्सपोर्ट करतो संरक्षण निर्यातीमध्ये चौतीस पट वाढ झालेली आहे. संरक्षण क्षेत्रामध्ये चौऱ्याहत्तर टक्के एफडीआय आलेला आहे. ऑपरेशन कावेरी सारखं ऑपरेशन राबवून सुदानमधनं तीन हजार भारतीय आपण**

**परत आणले. युक्रेनमधनं तेवीस हजार भारतीय सुरक्षित परत आणले त्यामुळे एकूणच भारतीयांचं महत्व भारतीय पासपोर्टचं महत्त्व भारतीयांच्या जीवनाचं महत्त्व हे ओळखून त्या प्रकारचं काम आपण केलं आहे.**

**एकनाथ शिंदे-मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या गेल्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या विकासयात्रेचा लाभ महाराष्ट्राला मिळाला, हे महाराष्ट्राचं भाग्य आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**मंत्रीमंडळ निर्णय**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याचा निर्णय काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात यासंदर्भातील विधेयक मांडलं जाणार आहे.

याशिवाय राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महसूल वाढीच्या दृष्टीने विविध प्रकारच्या दरांमध्ये सुधारणा करण्यासही राज्य मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. यामध्ये विविध प्रकारच्या मद्यावरच्या उत्पादन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय तसच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी 744 नवीन पदं आणि पर्यवेक्षीय स्वरूपाची 479 पदं अशा 1223 पदांच्या सुधारित आकृतीबंधालाही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

दरम्यान, राज्यात 15 जून नंतरच मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांनी पेरण्यांची घाई करू नये अस आवाहन कृषि विभागाने केल आहे. राज्यातील आगामी मोसमी पाऊस, पेरण्या, खतपुरवठा, धरणांमधील पाणीसाठा आदि विषयांबाबत माहिती देण्यासाठी काल मंत्रीमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी हे आवाहन करण्यात आल. राज्यातल्या सर्व प्रमुख धरणांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी यावेळी दिली.

**अर्थमंत्री**

बँकांच्या ठेवी, लाभांश, शेअर्स यामध्ये गुंतवणूक केलेल्या पण दावा न केलेल्या मालमत्ता, पात्र गुंतवणूकदारांना देण्यासाठी वेगवान प्रक्रीया राबवण्याचे आदेश केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले आहेत. आर्थिक स्थिरता आणि विकास परिषदेच्या बैठकीत त्या मुंबईत बोलत होत्या. विविध वित्तीय संस्थांनी यासाठी एकत्रित प्रयत्न करावे आणि जिल्हापातळीवर मेळावे घ्यावे, असं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्रात KYC प्रक्रिया सुलभ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**परिषद**

केंद्र सरकारने विकसित केलेल्या 'पीएफएमएस' प्रणालीने देशामध्ये एक विशाल डिजिटल परिसंस्था स्थापित केली असून त्यामुळे दुबार आणि बनावट लाभार्थ्यांचं निर्मूलन झाल आणि देशाच्या राजकोषात सुमारे 3 लाख 48 हजार कोटी रुपयांची बचत झाली, अस प्रतिपादन वित्त मंत्रालयाचे महालेखा नियंत्रक श्याम एस. दुबे यांनी केल. महालेखा नियंत्रक कार्यालय आणि देशाच्या अर्थ मंत्रालयाच्या वतीने पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी इथ सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीवरील दुसऱ्या प्रादेशिक परिषदेच आयोजन करण्यात आल होत, त्यावेळी ते बोलत होते.

**मुख्यमंत्री**

भांडवली बाजारातून निधी उभारणारी पिंपरी- चिंचवड ही देशातील पहिली महापालिका ठरल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. मुंबई शेअर बाजाराच्या आंतरराष्ट्रीय सभागृहात पिंपरी-चिंचवड महापालिकेचा हरित कर्जरोख्यांना सूचित करायचा कार्यक्रम काल पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**मी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचं मनापासून अभिनंदन करतो. ही देशातली पहिली महानगरपालिका झालेली आहे की ज्या महानगरपालिकेने ग्रीन बॉन्ड्स इश्यू केले आणि ही पण अतिशय आनंदाची गोष्ट आहे की जनतेने अतिशय चांगला प्रतिसाद या ग्रीन बॉन्ड्सला दिलेला इन्व्हेस्टर्सनी अतिशय चांगला प्रतिसाद दिला. मला सांगण्यात आलं की इश्यू झाल्यानंतर पहिल्या काही मिनिट त्याच शंभर कोटीच्या वर हे बॉड्स सबस्क्राईब झाले. आणि त्यानंतर पाच पटीनं या बँडचं सबस्क्रिप्शन झालं याचा अर्थ या बाँड्सच्या सार्थकतेमध्ये इन्व्हेस्टर्सचा विश्वास महाराष्ट्राच्या सरकारमध्ये आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये हा इन्व्हेस्टर्सचा विश्वास यातून आपल्याला स्पष्टपणे दिसतो आहे.**

या हरित कर्ज रोख्यांद्वारे महापालिकेने 200 कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारला आहे. हा निधी निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळीमाथा ते इंद्रायणी नगर चौक दरम्यानचा टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे.

**राष्ट्रवादी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा 26वा वर्धापन दिन काल पुण्यात साजरा झाला. या पुढच्या काळातही महाराष्ट्राचा विकास हेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं धोरण असेल असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात सांगितलं. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापनदिन कार्यक्रमही काल पुण्यात झाला. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करून त्यात 50 टक्के महिलांना निवडून आणा. राज्य चालवणारं नवीन नेतृत्व निर्माण करण्यासाठी काम करा असं आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी यावेळी केलं.

**वट पौर्णिमा**

राज्यात काल वटपौर्णिमेचा सण पारंपरिक पद्धतीनं आणि अनेक पर्यावरणपूरक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. वटपौर्णिमा व्रताला पत्नी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करते पण सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळमध्ये बॅरिस्टर नाथ पै शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उमेश गाळवणकर, डॉ. संजय निगुडकर आणि मित्रमंडळी गेली 15 वर्ष आपल्या पत्नीसाठी वटपौर्णिमा व्रत साजरं करण्याचा अनोखा उपक्रम करत आहेत. या व्रताचं यंदाच हे सोळावं वर्ष आहे.

**पेरणी**

शेतकऱ्यांनी बीज प्रक्रिया करूनच सोयाबीनची पेरणी करावी असं आवाहन नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव यांनी काल केलं. विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत कृषी विज्ञान केंद्रातर्फे खरीप

हंगामाची पूर्वतयारी हा कार्यक्रम जुन्नर इथल्या बोरी खुर्द या ठिकाणी आयोजित केला होता, त्यावेळी ते बोलत होते. याबाबत बोलताना नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राचे विस्तार विषय तज्ञ राहुल गाडगे म्हणाले....

**ही बीज प्रक्रिया करत असताना आपल्याला एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे की जे बियाणं आपण पेरणीसाठी वापरणार आहोत ज्यावेळेस आपल्याला पेरायचं त्याच्या अगोदर अर्धा तास आपल्याला ही बीज प्रक्रिया करायची बीज प्रक्रियेसाठी आपण जे काही जैविक खतं आहेत. बुरशीनाशकं आहेत ही आपल्याला साधारणतः सावलीमध्ये ही बीज प्रक्रिया करायची आणि सावलीमध्ये त्यावेळेला वाळवायचं आणि मगच आपण ते त्यासाठी घ्यायचं आहे त्याचबरोबर आपण सर्वात महत्त्वाची काळजी म्हणजे ज्यावेळेस आपण बियाणं म्हणून जे काही सोयाबीन वापरणार आहोत तर ते फुटलेलं नसलेलं पाहिजे जे काय साल असते वरती तर ती निघालेली नसावी त्याचबरोबर त्याची डाळ झालेली नसावी या पद्धतीचं दर्जेदार बियाणं निवडावं आणि त्याची आपण पेरणी करावी अशा पद्धतीने आपण त्याची पेरणी केली तर निश्चित आपला शेतकऱ्यांचा त्याच्यामध्ये फायदा होईल.**

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण, मराठावाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.